वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक–अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार–गुरूवार दि.४ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## मारपीट, पैसेवाटप, दारूचा महापूर, प्रलोभनांचे पीक, शिवराळ भाषेचा वापर हे सर्व प्रकार महाराष्ट्राच्या प्रतिमेला तडे लावणारेच...!

# गेवराईचा राडा कोणामुळे झाला ? याची जबाबदारी नेमकी कोण घेणार ?

Email:- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email:-editordivyawarta@gmail.com



बीड, (दिव्य न्युज):- लोकसभा, विधानसभेलाही जे घडत नाही ते कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत मंगळवारी बघायला मिळाले. बोगस मतदानाचे प्रकार घडले, नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराच्या भावाच्या फार्महाउसवर नोटांची बंडले, दारूच्या बाटल्या, बोटावरील शाई पुसण्यासाठीचे द्रव आढळले. गेवराईत तुफान हाणामारी झाली. कुठे गाड्यांची तोडफोड झाली, तर कुठे मारहाणीचे प्रसंग. आमदारच मतदान केंद्रावर जाऊन 'मत कसे द्यायचे' ते मतदाराला सांगत असल्याचा प्रकारही घडला.

'मेरा गाव, मेरा देश' अशा पद्धतीने स्थानिक मुद्दे, सामाजिक समीकरणे यावर प्रामुख्याने ही निवडणूक झाली. त्यामुळे गावागावांतील कटुतेचे संदर्भही वेगळे होते. निवडणुकीत राडे करण्याबाबत नेत्यांपेक्षा कार्यकर्त्यांच्या निवडणुकीने एक पाऊल पुढे टाकले. अर्थात अनेक ठिकाणी सूत्रधार हे नेतेच होते. त्यांचा आश्रय असल्याशिवाय कार्यकर्ते हिंमतही करीत नाहीत. आपल्या राजकीय वर्चस्वासाठी एकमेकांना भिडवून देणारे नेते निवडणूक आटोपली की नामानिराळे होतात; पण, निवडणुकीदरम्यान आलेल्या कटुतेचे पडसाद दीर्घकाळ समाजात उमटत राहतात याचे भान कोण बाळगणार?

▶▶ पान २ वर

## जयसिंह पंडित, बाळराजे पवार यांच्यासह ५५ जणांवर गेवराईत गुन्हे दाखल

गेवराई, (दिव्य न्युज):- नगरपालिका निवडणुकीतील मतदानाच्या दिवशी झालेल्या राड्यानंतर गेवराई पोलीस क्शन मोडवर आले असून भाजपचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांचे बंधू बाळराजे पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांचे बंधू जयसिंह पंडित यांच्यासह ५५ - जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


याबाबत अधिक माहिती अशी की दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी गेवराई नगरपालिकेसाठी मतदान होत असताना सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये तुंबळ मारामारी झाली होती. शिवराज बालाजी पवार आणि पृथ्वीराज जयसिंह पंडित या दोघांच्या भांडणाचा वाद अखेर आमदार विजयसिंह पंडित यांचे बंधू माजी आमदार अमरसिंह पंडित आणि जयसिंह पंडित विरुद्ध माजी आमदार लक्ष्मण पवार आणि त्यांचे बंधू बाळराजे पवार यांच्या पर्यंत पोहचले होते. ऐन मतदानादिवशी सत्ताधारी असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या गटामध्ये झालेल्या राड्यानंतर गेवराई पोलीस क्शन मोडवर आली असून, सीसीटीव्ही फुटेज च्या आधारे प्रथम दर्शनी आढळून आलेल्या व्यक्तींवर कारवाई करण्यात आली आहे. यात जवळपास

पान २ वर

## माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या हत्येचा कट

### जीवघेणा हल्ला झालेल्या पीएचा दावा; घटनेचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती

बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील गेवराई येथील घडलेल्या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज घेऊन आमदार विजयसिंह पंडित आणि माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी पोलीस



अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेऊन कारवाईची मागणी केली आहे. गेवराईचे माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे भाऊ त्रिंबक पवार यांनी आमदार विजयसिंह पंडित यांच्या गेवराईतील कृष्णाई निवासस्थानी

▶▶ पान २ वर

## जातीयवादी शक्तींना इस्लामची भिती वाटते

# इस्लाम हा शांती,प्रेम, आणि माणुसकीचा संदेश देणारा मजहब-मौलाना अरशद मदनी

मुंबई , (दिव्य न्युज):- जातीयवादी (फिरकापरस्त) शक्तींना इस्लामची भीती वाटते आणि यामुळेच त्या इस्लामला बदनाम करण्यासाठी खोटा प्रचार करत आहेत, असे जमीयत उलेमा-ए-हिंदचे अध्यक्ष अरशद मदनी यांनी म्हटले आहे. इस्लामला दहशतवादाशी जोडणे पूर्णपणे चुकीचे आहे, कारण इस्लाम हा शांती, प्रेम आणि माणुसकीचा संदेश देणारा मजहब आहे, असेही ते म्हणाले.

मदनी म्हणाले, इस्लामबद्दल अफवा पसरवून, लोकांच्या



मनात द्वेष भावना निर्माण केली जात आहे. हे लोक अणुबॉम्बला एवढे घाबरत नाहीत, जेवढे इस्लामला घाबरतात. एवढेच नाही तर, इस्लामला संपवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या शक्ती अपयशी ठरतील, इस्लाम कयामतच्या दिवसापर्यंत टीकेल, असेही ते म्हणाले.अरशद मदनी पुढे म्हणाले, सर्व लोक आदमची संतती आहेत आणि धर्म (मजहब) नंतर आले. जे लोक इस्लामविरोधी वातावरण निर्माण करत आहेत, त्यांना ना इतिहास


▶▶ पान २ वर

# बीड-गेवराई हायवेवर रोड रॉबरी

### तेलंगणाच्या महिलांची गाडी रात्री अडवून लुटले

बीड , (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील गेवराई पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर मध्यरात्री भीषण रोड रॉबरीची घटना समोर आली आहे. गेवराई शहराजवळील गढी फाटा परिसरात घडलेल्या या प्रकारामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तेलंगणा राज्यातील काही महिला प्रवासी या महामार्गावरून खासगी वाहनाने प्रवास करत होत्या. दरम्यान, मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी अचानक वाहनाला अडवत महिलांवर हल्ला चढवला. चोरट्यांकडे बंदूक, चाकू यांसारखी धारदार शस्त्रे होती. शस्त्रांचा धाक दाखवत महिलांना मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्यांच्याजवळील दागिने, मौल्यवान वस्तू, तसेच



रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावून घेत पलायन केले.घटनेची माहिती मिळताच गेवराई पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पीडित

▶▶ पान २ वर

# पुन्हा निवडणूक, न्यायालयाचा निर्णय उशीरा मिळाल्याने रद्द केली होती प्रक्रिया

### चार पालिकांच्या ११ जागांसाठी जाहीर होणार आज कार्यक्रम, २० ला मतदान

बीड, (दिव्य न्युज):- राज्य निवडणूक आयोगाने प्रकरणांमुळे काही जागांवरील निवडणुकांना स्थगिती देण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे मंगळवारी झालेल्या मतदान प्रक्रियेत या जागांसाठी मतदान झाले नव्हते. बीड जिल्ह्यात बीड, परळी, अंबाजोगाई आणि धारूर या चार नगरपालिकांमधील ११ जागांचा यात समावेश होता. या जागांसाठी आता आज गुरुवारी जिल्हाधिकारी नवा निवडणूक कार्यक्रम जाहीर करणार आहेत. २० डिसेंबर रोजी यासाठी मतदान होईल.

बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिकांसाठी मंगळवारी मतदानाची प्रक्रिया पार पडली. यात सुमारे ६५ टक्के मतदान झाले. दरम्यान, चार नगरपालिकांमधील काही उमेदवार अर्ज छाननी प्रक्रियेत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी बाद ठरवल्यानंतर न्यायालयात गेले होते. मात्र, त्यांचे निकाल २२ नोव्हेंबरनंतर निवडणूक विभागाला मिळाले. राज्यात अनेक ठिकाणी असे प्रकार झाले होते. काही ठिकाणी उमेदवारांना अर्ज मागे घेण्याची संधी मिळाली नव्हती. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयीन प्रक्रियेत अडकून उशिराने निकाल आलेल्या जागांवरील मतदान प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेतला होता.यामध्ये बीड जिल्ह्यातील बीड, परळी, अंबाजोगाई आणि धारूर या चार नगरपालिकांमधील

▶▶ पान २ वर

## गेवराईतील एका प्रभागाची पोटनिवडणूक कधी ?

गेवराई शहरातील प्रभाग ११ मधील राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा ऐन प्रचारादरम्यान मृत्यू झाला होता. त्यामुळे या प्रभागातील दोन्ही जागांवरील निवडणूक स्थगित केली गेली होती. आता या जागेसाठी कधी मतदान होते, याकडे लक्ष लागलेले होते. २० डिसेंबरच्या निवडणूक कार्यक्रमातया जागेचा समावेश होतो का? कीया जागेसाठी पुन्हा वेगळी पोटनिवडणूक होते, याकडे लक्ष असणार आहे

## या अकरा जागांचा निवडणुकीत समावेश

धारूर नगरपालिकेतील प्रभाग १० (अ), अंबाजोगाई नगरपालिकेतील प्रभाग १ (ब), ३ (अ), ६ (अ), १० (ब) या चार जागांचा समावेश आहे. तर, बीड नगरपालिकेतील प्रभाग ३ (ब) व परळी नगरपालिकेतील प्रभाग ३ (अ), प्रभाग ३ (ब), प्रभाग ९ (अ), प्रभाग ११ (ब), आणि प्रभाग १४ (ब) या पाच जागांचा समावेश आहे.

## चहा पार्टी ते सामिष भोजन

# गुलाल कुणाचा यावर जिल्ह्यात पैजा

बीड , (दिव्य न्युज):- स्थानिक पातळीवरील गावकी, भावकीची ईर्षा, राजकीय स्पर्धा आणि प्रतिष्ठा या मुळे अत्यंत चुरशीने झालेल्या निवडणुकीत गुलाल कुणाचा यावर आज अनेक ठिकाणी पैजा लावण्यात आल्या आहेत. अगदी चहा-नाष्ट्याबरोबरच, साग्रसंगीत मांसाहारी जेवणाबरोबरच डोकीचे केस काढण्यापर्यंतच्या पैजा लागल्या आहेत. निवडणुक निकाल तब्बल १८ दिवस लांबणीवर पडल्याने अनेक उमेदवारांनी कार्यकर्त्यांसह देवदर्शनाचा बेतही आखला आहे.

सोमवारी जिल्ह्यात ठिकठिकाणच्या स्थानिक पातळीवरील जुन्या संघर्षामुळे तणावाची स्थिती निर्माण झाली होती. आता मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर सर्वच उमेदवारासह राजकीय पक्षांनाही



निकालाचे वेध लागले आहेत. मात्र, उच्च न्यायालयाच्या आदेशाने मतमोजणीची प्रक्रिया दि. २१ डिसेंबर रोजी होणार आहे. या अवधीत मतदान यंत्रे बंदिस्त खोलीत कडेकोट बंदोबस्तात सीलबंद ठेवण्यात

▶▶ पान २ वर

# उमेद पोर्टलवरील अडचणी वाढल्या

# वक्फ संपत्ती अपलोडसाठी तारीख वाढवा

## खा.बजरंग सोनवणे यांची केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांच्याकडे मागणी

**बीड, (दिव्य न्युज):– वक्फ संस्थांच्या संपत्तीचे ऑनलाईन नोंदणीकरण उमेद पोर्टलवर सुरू असताना गेल्या काही दिवसांपासून या पोर्टलला गंभीर तांत्रिक अडचणी येत असल्याने नोंदणीचे काम ठप्प झाले आहे. यामुळे वक्फ संपत्ती अपलोडसाठी अंतिम तारीख वाढवावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांची भेट घेत पत्राद्वारे केली आहे.**



खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांची त्यांच्या कार्यालयात जात भेट घेतली. यावेळी वक्फ संपत्ती अपलोडच्या संदर्भात येणाऱ्या अडचणीबाबत सविस्तर चर्चा देखील केली. यावेळी रिजिजू यांना रितसर पत्रही दिले असून पत्रात म्हटले आहे, वक्फ संपत्ती अपलोडसाठी लॉग–इन आणि क्रॅश सारख्या समस्येमुळे महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये हजारो नोंदी प्रलंबित राहत आहेत.देशभरात अद्याप फक्त ४५,११६ वक्फ संपत्तींचेच अपलोडिंग पूर्ण झाले आहे, मोठ्या प्रमाणात रेकॉर्ड व मेपिंग तपासणीत अडकून आहेत, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि महाराष्ट्रात हजारो नोंदींचे अपलोडिंग प्रलंबित आहे, पोर्टल रात्रीच्या वेळेत काही मिनिटेच कार्यरत राहते आणि नंतर लगेच क्रॅश होते, अशी तक्रारही अनेक संस्थांनी केली आहे, सध्याची अंतिम मुदत ५ डिसेंबर २०२५ इतकी आहे. मात्र अशा तांत्रिक बिघाडांत पूर्ण प्रक्रिया करणे अशक्य असल्याचे खा.बजरंग सोनवणे यांनी सांगितले. वेळमर्यादा न वाढवल्यास अनेक वक्फ संस्थांचे महत्त्वाचे रेकॉर्ड प्रलंबितच राहतील, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. बीड जिल्ह्यासह राज्यातून वक्फ संस्थांच्या संपत्तीचे ऑनलाईन नोंदणीकरण उमेद पोर्टलवर सुरू असताना गेल्या काही दिवसांपासून या पोर्टलला गंभीर तांत्रिक अडचणी येत असल्याने नोंदणीचे काम ठप्प झाले असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या. याबाबतीत खा.बजरंग सोनवणे यांनी तातडीने केंद्रीय मंत्र्यांची भेट घेत हा महत्वाचा विषय मांडला. बीडसह महाराष्ट्र आणि देशभरात ही समस्या असल्याचेही केंद्रीय मंत्र्यांना सांगीतले. यावर योग्य ती कार्यवाही करू, अशा शब्दात केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांनी सकारात्मकता दाखविली.वक्फ संस्थांच्या संपत्तीचे ऑनलाईन नोंदणीकरण उमेद पोर्टलवर सुरू असताना गेल्या काही दिवसांपासून या पोर्टलला गंभीर तांत्रिक अडचणी येत असल्याने नोंदणीचे काम ठप्प झाले आहे. यामुळे वक्फ संपत्ती अपलोडसाठी अंतिम तारीख वाढवावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांची भेट घेत पत्राद्वारे केली आहे.

खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांची त्यांच्या कार्यालयात जात भेट घेतली. यावेळी वक्फ संपत्ती अपलोडच्या संदर्भात येणाऱ्या अडचणीबाबत सविस्तर चर्चा देखील केली. यावेळी रिजिजू यांना रितसर पत्रही दिले असून पत्रात म्हटले आहे, वक्फ संपत्ती अपलोडसाठी लॉग–इन आणि क्रॅश सारख्या समस्येमुळे महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये हजारो नोंदी प्रलंबित राहत आहेत.देशभरात अद्याप फक्त ४५,११६ वक्फ संपत्तींचेच अपलोडिंग पूर्ण झाले आहे, मोठ्या प्रमाणात रेकॉर्ड व मेपिंग तपासणीत अडकून आहेत, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि महाराष्ट्रात हजारो नोंदींचे अपलोडिंग प्रलंबित आहे, पोर्टल रात्रीच्या वेळेत काही मिनिटेच कार्यरत राहते आणि नंतर लगेच क्रॅश होते, अशी तक्रारही अनेक संस्थांनी केली आहे, सध्याची अंतिम मुदत ५ डिसेंबर २०२५ इतकी आहे. मात्र अशा तांत्रिक बिघाडांत पूर्ण प्रक्रिया करणे अशक्य असल्याचे खा.बजरंग सोनवणे यांनी सांगितले. वेळमर्यादा न वाढवल्यास अनेक वक्फ संस्थांचे महत्त्वाचे रेकॉर्ड प्रलंबितच राहतील, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. बीड जिल्ह्यासह राज्यातून वक्फ संस्थांच्या संपत्तीचे ऑनलाईन नोंदणीकरण उमेद पोर्टलवर सुरू असताना गेल्या काही दिवसांपासून या पोर्टलला गंभीर तांत्रिक अडचणी येत असल्याने नोंदणीचे काम ठप्प झाले असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या. याबाबतीत खा.बजरंग सोनवणे यांनी तातडीने केंद्रीय मंत्र्यांची भेट घेत हा महत्वाचा विषय मांडला. बीडसह महाराष्ट्र आणि देशभरात ही समस्या असल्याचेही केंद्रीय मंत्र्यांना सांगीतले. यावर योग्य ती कार्यवाही करू, अशा शब्दात केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांनी सकारात्मकता दाखविली.

---

पान ४ वरून

## अहमदनगर–बीड डेमू

सुधारित वेळेनुसार आता ही गाडी अहमदनगरहून सकाळी ७.४५ वाजता निघून बीडला त्याच वेळेत म्हणजेच दुपारी १२:३० वाजता पोहोचेल. याचा अर्थ, बीडपर्यंत पोहोचण्यासाठी लागणाऱ्या वेळेत ५० मिनिटांची बचत झाली आहे. परतीच्या प्रवासातही वेळेची मोठी बचत झाली आहे. पूर्वी बीडहून दुपारी १ वाजता निघणारी ही रेल्वे अहमदनगरला सायंकाळी ६.३० वाजता पोहोचत होती. म्हणजेच या प्रवासाला तब्बल ५ तास ३० मिनिटे लागत होते. आता सुधारित वेळेनुसार बीडहून ती दुपारी १ वाजता निघेल, पण ती अहमदनगर येथे सायंकाळी ५.४५ वाजता पोहोचेल. यामुळे परतीच्या प्रवासात थेट ४५ मिनिटांची बचत झाली आहे. या सुधारणेमुळे दोन्ही बाजूंच्या प्रवासात प्रवाशांचा येणे आणि जाणे असा १ तास ३९ मिनिटांचा वेळ वाचणार आहे, जो रेल्वे मार्गावरील गती सुधारल्याचे स्पष्ट संकेत देतो.

## वडवणी तालुक्यातील

नादुरुस्तीसह विजेचे इतर प्रश्न आहेत. रस्ते, नाल्या, सफाईसह इतर प्रश्न असतानाच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत मतदारांचे प्रश्न कसे सोडवायचे याकडे दुर्लक्ष केले जात आहे. यावर इच्छुक काही करतांना दिसत नाही फक्त लोकांना भेटीगाठी करतांना दिसत आहे. आजपर्यंत एकही जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य गावातील अडचणी जाणून घेण्यासाठी गावात दिसले नाही. चिंचाबाभर सर्कल मध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीचे इच्छुक उमेदवार गावा–गावात फिरुन मतदारांच्या भेटी घेत आहेत. त्यासाठी गावातील युवकांना आपल्याकडे ओढण्यासाठी त्यांच्याशी संपर्क वाढविला जात आहे. आपले तिकीट फिक्स असल्याचे सांगून इच्छुक पक्षाची उमेदवारी मिळाल्याच्या आविर्भावात गावातील समस्या सोडविण्यासाठी काय करता येईल यावर चर्चा करीत नाही. याकडे कोणताही पक्ष नसला तरी आम्ही त्यांना मदत करु असे परिसरातील नागरिकांनी आपले मत व्यक्त केले आहे.

## रेल्वे कामाला

नागरिकांनी ट्रॅक परिसरात सुरक्षितता पाळण्याचे कठोर आवाहन करण्यात आले आहे. नव्याने बांधलेल्या ट्रॅकवर ६ डिसेंबर २०२५ रोजी इंजिन चाचणी होणार आहे. त्यानंतर रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून १० व ११ डिसेंबर रोजी सखोल तपासणी आणि हाय–स्पीड चाचण्या घेण्यात येणार आहेत. सकाळी १० ते संध्याकाळी ६ दरम्यान रेल्वे उच्च वेगाने धावणार असल्याने परिसरातील नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बीड वडवणी परिसरातील गावकरी, शेतकरी, गुरेढोरे धारक, रस्ते वापरकर्ते, ग्रामपंचायती तसेच सरपंचांनी रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन खा. बजरंग सोनवणे यांनी केले आहे. चाचणीतील कोणताही अडथळा टाळण्यासाठी ट्रॅक परिसर पूर्णपणे मोकळा ठेवावा, असेही म्हटले आहे.

---

पान १ वरून

## गेवराईचा राडा

लोकशाही प्रक्रियेतून होणाऱ्या निवडणुकीला काळिमा फासणारे लोक उद्या नगरपरिषदांमध्ये निवडून आले तर पाच वर्षांच्या त्यांच्या कारभारातही दादागिरी, खाबूगिरीचे प्रदर्शन होत राहील हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मतदानादरम्यान जे धुमशान जागोजागी बघायला मिळाले त्यात सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते सामील होते. सात–आठ वर्षांपासून न झालेली निवडणूक आली आणि राजकीय इच्छा–आकांक्षा उचंबळून आल्या.

नगरपरिषदांच्या माध्यमातून होणारी विकासकामे, त्यातील टक्केवारी यामुळे आता नगरपरिषदांना कधी नव्हे एवढे महत्त्व आले आहे. महत्त्वाकांक्षेची जागा राक्षसी महत्त्वाकांक्षेने घेतली असून, त्यातूनच हिडीस प्रसंग घडत आहेत. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पुन्हा पैसा हे आता खालपर्यंत झिरपले असून, त्याला अटकाव करणे कठीण झाले आहे. असे प्रकार रोखण्याची जबाबदारी नेमकी कोणाची हेही निश्चित झाले पाहिजे.

या संपूर्ण निवडणुकीत राज्य निवडणूक आयोगावर टीकेची सर्वपक्षीय झोड उठली. आयोगाने अनेक घोळ घातले. निवडणूक शांततामय वातावरणात व्हावी यासाठीची सर्वांत मोठी जबाबदारी अर्थातच आयोगाची होती. निवडणुकीच्या काळात संबंधित सर्व यंत्रणा या आयोगाच्या कक्षेत येतात आणि त्यांनी दिलेल्या आदेशांचे पालन हे या यंत्रणांना करावेच लागते. निवडणूक म्हटली की प्रत्येक ठिकाणच्या राजकीय परिस्थितीचा अंदाज घेऊन त्यादृष्टीने कायदा व सुव्यवस्था राखावी लागते.

राजकीयदृष्ट्या संवेदनशील, अतिसंवेदनशील मतदान केंद्रे, नगरपरिषदा कोणत्या याचे सूक्ष्म नियोजन करणे अपेक्षित असते. ते गृहविभागाच्या मदतीने आयोगाने करून ठेवलेले होते का? आणि करून ठेवलेले होतेच तर मतदानादरम्यान जे घडले ते रोखता का आले नाही, हा प्रश्न आहे. राज्याच्या गुप्तचर यंत्रणेने वेळोवेळी पोलिस दल आणि आयोगाला संभाव्य संवेदनशील केंद्रांबाबत माहिती दिली होती का? दिली असेल तर ती कितपत गांभीर्याने घेऊन खबरदारीच्या उपाययोजना करण्यात आल्या हेही समोर आले पाहिजे. आयोगाचे आयुक्त किंवा सचिव हे निवृत्त आयएएस अधिकारी असतात. एका अर्थाने हा आयोग म्हणजे रिटायर्ड क्लबच. गृहविभागापासून ज्या यंत्रणांची मदत आयोगाला निवडणुकीसाठी घ्यावी लागते तेथील विभागप्रमुख हे विद्यमान आयएएस, आयपीएस अधिकारी असतात. त्यामुळे ते आयोगाला फार मोजत नाहीत, असे तर नाही? केंद्रीय निवडणूक आयोगाचा आदेश जेवढ्या गांभीर्याने घेतला जातो तेवढे गांभीर्य राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशांबाबत नसते.

निवडणुका भयमुक्त वातावरणात घेण्यासाठी जबाबदार असलेल्या सर्व यंत्रणांमध्ये परस्पर समन्वय नव्हता, हे उघड होते. जिल्हा परिषद आणि महापालिकांच्या निवडणुका अद्याप बाकी आहेत. नगरपरिषदांचा टप्पा दोनही बाकी आहे. पहिल्या मोठ्या टप्प्यात जे काही विपरीत घडले त्याची पुनरावृत्ती तरी नको.. राडा संस्कृतीने महाराष्ट्राची अप्रतिष्ठा झाली आहेच; ती आणखी होऊ नये एवढेच. 'नगरपरिषदांच्या निवडणुकीत आयोगाने घातलेल्या गोंधळाची पुनरावृत्ती नंतरच्या निवडणुकांत होऊ देऊ नका,' अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहेच. मारपीट, पैसेवाटप, दारूचा महापूर, प्रलोभनांचे पीक, शिवराळ भाषेचा वापर या प्रकारांची पुनरावृत्ती होणार नाही याची हमी सर्वच राजकीय पक्षांनी दिली तर महाराष्ट्राच्या प्रतिमेला आणखी तडे जाणार नाहीत एवढेच!

## माजी आमदार अमरसिंह

जाऊन स्वीय सहाय्यक अमृत डावखर यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्याच्या घटनेचा सीसीटीव्ही समोर आला आहे. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या हत्येचाच कट रचल्याचा दावा डावखर यांच्या माध्यमातून करण्यात आला होता.

दरम्यान या संपूर्ण घटनेची लेखी तक्रार आणि सीसीटीव्ही फुटेज पोलीस अधीक्षकांना देण्यात आले आहे. माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे भाऊ त्रिंबक पवार आमच्यागाड्यांना धडक देऊन आमच्यावर हल्ले करण्यासाठी आले होते. हे सर्व सीसीटीव्ही फुटेजमध्ये आले आहे. त्रिंबक पवार यांच्याकडून २५ ते ३० वर्षांपासून लोकप्रतिनिधी म्हणून राहिलेल्या व्यक्तीला मारण्याचे कटकारस्थान करण्यात आले त्यामुळे सामान्य व्यक्तीचे तिथे काय आहे. या प्रवृत्ती आणि व्यक्तीपासून धोका असल्याचे आमदार विजयसिंह पंडित यांनी म्हटले आहे.

ही संपूर्ण घटना घडल्यानंतर अद्याप पवार कुटुंबाकडून माध्यमांसमोर कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. यावरूनच आमदार विजयसिंह पंडित यांनी पवार कुटुंबावर हल्लाबोल केला आहे. पवार विकृत विक्षिप्त मनोवृत्तीचे आहेत, अशा घटना करत असताना त्यांना काहीही भान नसते. घटना घडल्यानंतर ते तोंड लपून फिरत असल्याची टीका पंडित यांनी केली आहे.

बीडच्या गेवराईमध्ये नगरपरिषद निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेदरम्यान माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या गेवराई येथील कृष्णाई कार्यालयामध्ये आठ ते दहा जणांनी हल्ला केला होता. यामधील एक हल्ल्यादरम्यानचा सीसीटीव्ही समोर आला आहे. आरोपी एका चार चाकी गाडीतुन येत आहेत कार्यालयाबाहेरील स्कॉर्पिओ गाडीला धडक देऊन उतरल्यानंतर पळत जात आहेत. यासंदर्भात थोड्या वेळापूर्वीच आमदार विजयसिंह पंडित आणि माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन लेखी तक्रार दिली आहे. तर हा हल्ला माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या हत्येच्या उद्देशाने झालेला होता असा दावा आमदार विजयसिंह पंडित यांच्यासह अमरसिंह पंडितांचे स्वीय सहाय्यक डावखर यांनी केलेला आहे.

माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या घरी जाऊन त्यांचे स्वीय्य सहाय्यक अमृत डावखर यांना बेदम मारहाण करण्यात आली. लाठ्या–काठ्या आणि बेल्टने मारहाण करण्यात आल्याची माहिती अमृत डावखर यांनी दिली आहे. बाळराजे पवार यांनी आपल्यावर हल्ला करण्यापूर्वी अमरसिंह पंडित यांच्या बाबत विचारणा केली, त्यांच्या खुनाचा कट रचून ते घरी आले होते, त्यांच्या हत्येचा कट रचण्यात आलेला होता असा थेट दावा डावखर यांनी केला आहे.

त्याचबरोबर बाळराजे यांच्याबरोबर काही अनोळखी लोक होते. माझा देखील जीव गेला असता, मात्र गाडी चालकाने मला सोडवलं. अशा प्रकारचा धक्कादायक दावा, अमरसिंह पंडित यांचे स्वीय सहाय्यक अमृत डावखर यांनी केला आहे. यासंदर्भात कठोर कारवाई करण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे. डावकर यांच्यावर सध्या बीड येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांनी केलेल्या या दाव्यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

## जयसिंह पंडित, ब

५० हून अधिक लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात आमदार विजयसिंह पंडित यांचे बंधू जयसिंह पंडित आणि माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांचे बंधू बाळराजे पवार यांच्यासह पृथ्वीराज पंडित, शिवराज पवार, राहुल उमाप, विजय सुतार, जीवन साळवे, प्रकाश साळवे, संकेत कडिकर, शेख खाजा, राहुल खंडागळे अमर शिंदे, मुन्ना मोटे, विशाल भुंबे, विठ्ठल मोटे, विष्णू आतकरे, सय्यद एजाज मेंबर, कृष्णा पाटोळे, कैलास माने, प्रदीप सुतार, प्रदीप नवरे (पाडळशिंगी) यांच्यासह २० ते ३० यांच्या विरोधात मा. जिल्हा दंडाधिकारी बीड यांचे जा. क्र. २०२५/गृह/पोल– १/स्था.स्व. संस्था निवडणूक – २०२५ प्रमाणे कलम १६३ बी.एन.एस.एस. आदेशाचे उल्लंघन केले. पोलीस ठाणे गेवराई गुन्हा रजिस्टर नंबर ७१२/२०२५ कलम २२३, १८९(१), (२), १९१(१), १९१(२), १९०, ११५ (१), (२), ३२४(१), ३५२, ३५१ (१), (२) भो. न्या. सं. प्रमाणे दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती गेवराई पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी दिली आहे.

## इस्लाम हा शांती,प्रेम,

समजतो ना देशाबद्दल प्रेम आहे. त्यांनी जनतेला आवाहन केले की, तुम्ही कोठेही राहात असाल, तरी प्रेम आणि बंधुत्वाचा संदेश जिवंत ठेवा. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन सर्वांनी प्रेमाने आणि सलोख्याने रहायला हवे. धर्माच्या नावावर द्वेष पसरवणाऱ्यांच्या मार्गावर चालणे योग्य नाही आणि अशी विचारसरणी देशासाठी हानिकारक आहे.

'सत्ता कायम नसते' –

जे लोक सत्तेचा उपयोग द्वेष पसरवण्यासाठी करतात, त्यांनी हे लक्षात ठेवायला हवे की, सत्ता कोणाकडेही कायमस्वरूपी राहत नाही, सरकारे येतात–जातात. इस्लाम १४०० वर्षांपासून जिवंत आहे आणि तो कयामतपर्यंत जिवंत राहील, असेही मदनी म्हणाले.

## बीड–गेवराई

महिलांकडून प्राथमिक तक्रार नोंदवण्यात आली असून तपासासाठी विशेष पथक नियुक्त करण्यात आले आहे. महामार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी परिसरात नाकेबंदीही केली आहे.अंधाऱ्या, निर्जन पट्ट्यात घडलेल्या या धाडसी लूटप्रकरणामुळे महामार्गावरील सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी वाढत्या प्रवासी वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारचे गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. दरम्यान, या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

बीडचा बिहार झाला आहे का?

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी कृत्यांच्या ज्या सुरस कथा बाहेर येत आहेत, त्या ऐकल्यानंतर बीड जिल्हा महाराष्ट्रातला बिहार झाला आहे का ? असा प्रश्न सध्या सर्वत्र विचारला जातो आहे.बीडमध्ये खून, दरोडे, दादागिरी घटनांनी सध्या वातावरण ढवळून निघाले आहे. महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेचे वाभाडे या घटनांमुळे निघत आहेत. विशेषतः बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी कृत्यांच्या ज्या सुरस कथा बाहेर येत आहेत, त्या ऐकल्यानंतर बीड जिल्हा महाराष्ट्रातला बिहार झाला आहे का ? असा प्रश्न सध्या सर्वत्र विचारला जातो आहे. जेव्हा कायदा व सुव्यवस्थेची स्थिती चिंताजनक होते, गुंड व माफियांचे समांतर प्रशासन सुरू होते, तेव्हा बिहारसदृष्य परिस्थिती झालीय, असे म्हटले जाते. अलीकडच्या काळात बिहारच्या स्थितीत बरीच सुधारणा झालीय. पण ही तुलना होतेच. महाराष्ट्रातील बीड जिल्ह्याने आता बिहार होण्याचा बहुमान मिळवलाय.

## पुन्हा निवडणूक

११ जागांचा समावेश होता. यामध्ये बीड व धारूरमध्ये प्रत्येकी १, अंबाजोगाईत चार, तर परळीत सर्वाधिक पाच जागा होत्या. त्यामुळे मंगळवारी झालेल्या मतदान प्रक्रियेत ११ जागांवर मतदान झाले नव्हते. यासाठी नव्याने कार्यक्रम घोषित केला जाणार होता. त्यानुसार आज ४ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी या नव्या कार्यक्रमाची घोषणा करणार आहेत. २० डिसेंबर रोजी मतदान होईल. त्यानंतर सर्वांची एकत्रित २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

मंगळवारी जिल्ह्यात ६५ टक्के मतदान, पुरुषांचे सर्वाधिक

जिल्ह्यात एकूण ६५.२० टक्के मतदान झाले. सहा नगरपालिकांमधील ४ लाख १५ हजार ८१९ मतदारांपैकी २ लाख ७१ हजार १३० मतदारांनी हक्क बजावला. पुरुषांच्या मतदानाचे प्रमाण ६७.१२ टक्के राहिले. २ लाख १३ हजार ७६९ पुरुष मतदारांपैकी १ लाख ४३ हजार ४९१ जणांनी मतदान केले. महिलांच्या मतदानाचे प्रमाण ६३.१७ टक्के होते. २ लाख २ हजार २८ महिला मतदारांपैकी १ लाख २७ हजार ६२६ महिलांनी मतदान केले. १३ तृतीयपंथीयांनीही हक्क बजावला.

बनावट मतदानाचा प्रयत्न : अधिकाऱ्याची पोलिसांत तक्रार

अंबाजोगाई । नगरपरिषदेच्या निवडणुकीदरम्यान, जिल्हा परिषद शाळा, शिवाजी चौक येथील मतदान केंद्र क्र. १०/४ मध्ये बनावट मतदान झाल्याचा प्रकार समोर आला. या केंद्रावर मतदान अधिकारी क्र. १ म्हणून १ म्हणून कार्यरत असलेले सुनिल साहेबराव निकम यांनी स्वतः अंबाजोगाई पोलिस स्टेशनमध्ये अदखलपात्र तक्रार नोंदवली आहे.

## गुलाल कुणाचा

आली आहेत. आता या मतदान यंत्रे ठेवण्यात आलेल्या खोल्याची कुलुपे दि.२१ डिसेंबर रोजीच काढण्यात येणार असल्याने तोपर्यंत उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते चर्चेत मग्न झाले आहेत.आज मतदान किती झाले, कोणत्या गल्लीत कुणाला मतदान अधिक झाले, कुणाच्या बूथवर गर्दी होती, कुणी किती मतदार मतदान केंद्रापर्यंत आणले यावर आकडेमोड करत असल्याचे दिसत आहे. यावरून कोणत्या उमेदवाराच्या अंगावर गुलाल पडेल याचा अंदाज बांधण्यात कार्यकर्ते उमेदवार मग्न आहेत.

यावेळी थेट नगराध्यक्ष निवड होत असल्याने शहराचा कल कोणत्या पक्षाकडे अथवा स्थानिक नेत्याकडे आहे हे लक्षात येणार असल्याने नेते मंडळींनाही निकालाची मोठी उत्सुकता लागून राहिली आहे. पुढचे राजकीय भवितव्य निश्चित करणारी ही निवडणूक असल्याने कार्यकर्त्यांकडून आणि उमेदवारांकडून मतदानाचा अंदाज घेण्यात राजकीय नेते आज दिवसभर व्यस्त होते.दरम्यान, गुलाल कुणाचा यावर आज कार्यकर्त्यांमध्ये पैजा लावण्यात येत होत्या. राजकीय निकालावर पैजांना बंदी असल्याने आपसातच यावर चर्चा करून पैजा लावण्यात येत आहेत. यामध्ये अगदी चहा पार्टी पासून साग्रसंगीत सामिष जेवणावळीचे बेत निश्चित करण्यात येत आहेत . तर उमेदवारांची गेले पंधरा दिवस पायपीट बरोबरच मतदानाचा तणाव निर्माण झाल्याने अनेक उमेदवारांनी देवदर्शनाचे बेत आखले आहेत.